

# वास्तुदोष

**एखादं घर बांधायचं झालं तर त्यावेळी वास्तुशास्त्राचा आधार घेता येतो. पण मुळातच तयार स्वरुपातील वास्तू आपण घेतो त्यावेळी त्यात आढळणाऱ्या मुख्य माहिती खास दोषांची आमच्या वाचकांसाठी.**

मागील साठ ते पासष्ट वर्षांपासून जगात सर्वत्र आजच्या रुढ झालेल्या सेल्फ कन्टेंड निवास पध्दतीचा वापर सुरु झाला व त्यामुळे आपण काही वास्तुदोषांना सोयीस्कररीत्या कायमस्वरुपी स्थान दिले आहे. यातील अनेक दोष अगदी बंगलेपध्दतीत पण आपण बिनदिक्कतपणे स्वीकारले आहेत. त्यातील काही आपल्या माहितीसाठी येथे देत आहे.

**तयार वास्तुमधील दोष**

- इमारतीचे कंपाऊंड गेट जे आपल्या मर्जीनुसार म्हणजेच वास्तुशास्त्रानुसार असतेच असे नाही.
- प्लॉटचा आकार चौकोनी अथवा आयताकृती असतोच असे नाही.
- प्रवेश दरवाज्यासमोर दुसऱ्या घराचा दरवाजा असतो.
- प्रवेशद्वारासमोर अथवा आजूबाजूला जिना आणि लिफ्ट असते.
- स्वयंपाकघरात गॅस, शेगडी व पाण्याचा साठा म्हणजेच अग्नीतत्व व जलतत्व जवळ- जवळ येणे.
- ९० ते ९५ टक्के घरांमध्ये ब्रम्हस्थान म्हणजेच मध्यवर्ती स्थान जे साधारणतः एकूण क्षेत्रफळाच्या ९ते११ टक्के असते. त्यावर भिंती अथवा कॉलमूस येणे.
- आपण डिझाइन केलेल्या इमारती इतर इमारतींपेक्षा वेगळ्या असाव्या अशी संकल्पना मानून इमारतीमधील कट्स अथवा वाढ यामुळे अनेक वास्तुदोष निर्माण होतात.
- न्हाणीघर, शौचालय आणि भांडी धुण्याचे सफाईचे स्थान घरात आत असणे हे वास्तुशास्त्रनुसार संमत नाही.
- अंतर्गत खोल्यांचे दरवाजे नेहमीच शुभ दिशांमध्ये असतातच असे नाही.
- मूलतः नैऋत्य दिशेतील बांधकाम हे इतर दिशांपेक्षा जास्त जाड व जास्त उंच असावे. परंतु आपल्याकडे सर्व भिंती एकाच परिमाणात बांधलेल्या असतात.
- शौचालय व बाथरुम एकत्र असणे ही एक नवीनच प्रथा आजकाल रुढ झाली आहे जी योग्य नाही.
- दिशांचे तानमान न बाळगता विचित्र प्रकारचे देखावे अथवा तसबीरी भिंतीवर लावलेल्या असणे.
- बेडरुममधील पलंगाला डोक्याच्या दिशेने आरसा असणे.
- मृत व्यक्तीचा फोटो देवघरासोबत किंवा इतरत्र दिशासूत्र न पाळता अथवा देवांच्या फोटोसमवेत लावलेला असणे.
- प्रत्येक इमारतीमध्ये बऱ्याचदा जिन्याखाली इलेक्ट्रीक मीटर रुम असते. म्हणजे एक तर जिना किंवा मीटर रुम या दोन्हीपैकी एक किंवा दोन्ही वास्तुदोष निर्माण करणारे असतात.
- या व्यतिरिक्त अनेक असे वास्तुदोष आपल्या आजच्या निवास पध्दतीमधील अविभाज्य भाग बनले आहेत. काही दोष तांत्रिक अडचणींमुळे तर काही दोष आपली गरज म्हणून किंवा केवळ अंगवळणी पडले असल्याने ते सोबत घेऊनच आपण वास्तू निर्मिती करीत असतो. अशा वेळी या दोष निरुपणासाठी काही सर्वसाधारण उपाययोजना करून या वास्तुदोषांची तीव्रता कमी करणे अत्यावश्यक ठरते.